अध्यक्षीय मनोगत -

सहकारी बँकिंग क्षेत्र आज अनेक आव्हानांच्या काळातून जात आहे. अवलोकनाअंती असे दिसते की सहकारी बँकांना बँकिंग व्यवहारात दुय्यम स्थान मिळत आहे.

यात सर्वात मोठा बदल म्हणजे २०२० साली बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ मध्ये झालेली दुरुस्ती. या दुरुस्तीनंतर हा कायदा नागरी सहकारी बँकांना जवळपास पूर्णतः लागू करण्यात आला आहे. यामुळे व्यवस्थापन, लेखापरीक्षण, भांडवल पर्याप्तता आणि संचालक मंडळाच्या अधिकारांवर रिझर्व्ह बँकेचे थेट नियंत्रण आले आहे. शासनाची व रिझर्व बँकेची धोरणे ही सहकारी बँकांना बळ देण्याऐवजी दिवसेंदिवस निर्बंध वाढवण्याकडेच झुकत आहेत, असेच यातून दिसते.

अशा प्रतिकूल आणि अधिक काटेकोर नियमन असलेल्या परिस्थितीत नागरी सहकारी बँकांना खाजगी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, स्मॉल फायनान्स बँका, मोठ्या फायनान्स कंपन्या आणि पतसंस्था या सर्वांशी तीव्र स्पर्धा करून आपले लोकोपयोगी स्थान टिकवावे लागत आहे. हे आव्हान केवळ आर्थिक नाही, तर अस्तित्वाचे आहे.

या आव्हानावर मात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सेवेची गुणवत्ता. आमचा कर्मचारी हा केवळ व्यवहार करणारा नसून, ग्राहकाचा विश्वास संपादन करणारा सल्लागार असला पाहिजे. यासाठी त्याला सहकारी कायद्याबरोबरच आता पूर्णतः लागू झालेल्या बँकिंग रेग्युलेशन ॲक्टच्या तरतुदी, रिझर्व्ह बँकेचे वेळोवेळी येणारे अध्यादेश, सायबर सुरक्षा, केवायसी/एएमएलचे नियम यांचे सखोल ज्ञान असणे अनिवार्य झाले आहे.

ही क्षमता निर्माण करणे ही असोसिएशन म्हणून आमची सामूहिक जबाबदारी आहे, या जाणिवेतून या ई-लर्निंग बुकची निर्मिती झाली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनने असा डिजिटल शैक्षणिक प्रयोग केला आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

या उपक्रमासाठी ज्यांनी अथक परिश्रम घेतले, त्या सर्व लेखकांचे, तज्ज्ञांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांमधील ज्या जेष्ठ आणि अनुभवी व्यक्तींनी मौलिक मार्गदर्शन करून या पुस्तकाला दिशा दिली, त्यांच्याबद्दलही मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

आज या पुस्तकाचे लोकार्पण होत असताना, माझे सर्व सभासद बँकांच्या संचालक मंडळाला कळकळीचे आवाहन आहे की, हे पुस्तक आपल्या बँकेतील जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचेल यासाठी आपण विशेष प्रयत्न करावेत. कर्मचाऱ्यांचे अद्ययावत ज्ञान हेच २०२० नंतरच्या नव्या नियामक युगात बँकेचे सर्वात मोठे भांडवल ठरणार आहे.

निपुण कोरे

अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन